**फौजदारी किरकोळ अर्ज नं. ४३७/२०२२ मधील निशाणी क्र.०१ खालील आदेश.**

कडुबा कौतीक मोरे वि. महाराष्ट्र राज्य.

अर्जदार यांनी सदरचा अर्ज फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ अंतर्गत कलम ४५१, ४५७ पिशोर पोलिस ठाणे यांनी गु.र.नं. ३५६/२०२२ कलम ३७९ भा.दं.वी. मध्ये जप्त केलेली ट्रॅक्टरची ट्रॉली वाहन परत मिळणेकरीता दाखल केला आहे ज्याचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अ.- रजिस्ट्रेशन नं. - MH-20-AY-9744
चेसीस नं. – PATB-A0329

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, सदरचे वाहन अर्जदार यांच्या मालकीचे असून अर्जदार यांच्या दैनंदिन वापरातील आहे. सदरचे वाहन हे प्रस्तुत गुन्हात पिशोर पोलिसांनी खोटी केस करुन जप्त केले आहे. सदरचे वाहन हे पोलिस स्टेशनमध्ये पडून राहील्यास नैसर्गिक आपत्तीपासून नुकसान होणार आहे. त्यामुळे सदरचे वाहन बॉन्डवर परत मिळावे अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

अर्जदार यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेतः-

| अ.क्र. | तपशील | निशाणी |
|---|---|---|
| १. | अर्जदार यांचे वाहन क्र. एमएच-२०-ए वाय-९७४४ चे आर.सी.बुकची साक्षांकित प्रत | निशाणी ३ अ.क्र. १ |
| २. | अर्जदार यांचे आधार कार्डची प्रत | निशाणी ३ अ.क्र. २ |

३. तपासीक अंमलदार यांनी निशाणी ५ येथे आपले म्हणणे सादर करुन असे कळविले आहे की, सदर गुन्हातील जप्त वाहन सोडले तर तो पुन्हा बेकायदेशिररित्या मुरुमाची ट्रॉलीमध्ये भरुन वाहतुक करेल तसेच ज्या ज्या वेळी तपास कामी जप्त वाहनाची गरज पडेल त्या त्या वेळेस हजर करणार नाही तसेच निकल लागे पर्यंत गुन्हयातील जप्त वाहन कोणालाही विकेल किंवा गहान ठेवीन याची शाश्वती नाही. तरी, अर्जदार याने मागणी केलेला मुद्देमाल परत करण्यास योग्य तो

आदेश करण्याची विनंती केली आहे.

४. सहाय्यक सरकारी अभियोक्ता आर.अं.पाटील यांनी सदर अर्जास आपले म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. त्यांचे असे कथन आहे की, सदरील गुन्हयाचा तपास चालु असुन, जप्त मुद्देमाल सोडल्यास ती विक्री होण्याची किंवा त्यात बद्दल होण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे गुन्हयाचे गांर्भीय लक्षात घेता, प्रस्तुत अर्ज नामंजुर करण्यात यावा.

५. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी व तसेच इतर आरोपींचे म्हणणेही मागवण्यात आले होते. गु.र.नं.३५६/२०२२ चे प्रथम खबर अहवाल पाहीले असता असे लक्षात येते की, फिर्यादी पोलीस अधिकारीच आहे. त्यांचे म्हणणे नि.५ वर आले आहे. या प्रकरणातील इतर आरोपी म्हणजेच दत्तु मोरे, कृष्णा पवार, ज्ञानेश्वर बोटकर, संदिप पवार, अनिल कडुबा मोरे, सुर्यभान पवार व समाधान देवरे यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.४३६/२०२२, ४२२/२०२२, ४२१/२०२२, व ४३२/२०२२ यामध्ये जप्त करण्यात आलेले वाहनं मिळण्यासाठी अशा प्रकारचेच अर्ज दाखल केले आहे. त्यामुळे त्यांच्या म्हणण्याविना प्रस्तुत प्रकरण पुढे चालवण्यात येत आहे. अर्जदारतर्फे विधीज्ञ, सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

६. तपासीक अंमलदार यांच्या म्हणण्यावरुन स्पष्ट होते की, सदरचे वाहन हे गु.र.नं. ३५६/२०२२ मध्ये जप्त करण्यात आलेले आहे. जप्त वाहनाच्या मालकीबाबत अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन जसे की, आर.सी.बुक त्यातून असे लक्षात येत आहे की, जप्त वाहन हे अर्जदाराच्या मालकीचेच आहे. तसेच त्याबाबत कोणताही वाद नाही. तसेच सदर वाहनासाठी इतर कोणीही मागणी केली नाही.

७. मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***Sundharbhai Ambalal Desai V/s. State of Gujarat (Supra) reported in 2003 All MR (Cri.) 363 (SC)*** यांनी मुद्देमाल परतीबाबत आदेश करताना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना मार्गदर्शन सुचना घालून दिलेल्या आहेत. या मार्गदर्शन सुचनाप्रमाणे कोणताही मुद्देमाल १५ दिवस ते १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता

पोलिस स्टेशनमध्ये पडून राहता कामा नये त्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी योग्य ते आदेश केले पाहिजेत असे निर्देश दिले आहेत.

८. सदरचे वाहन पोलिस स्टेशनमध्ये जास्त दिवस पडून राहीलेस ऊन, वारा व पाऊस यामुळे या वाहनाचे नुकसान होवू शकते. अर्जदार यांच्या मालकीबाबत तपासीक अंमलदार अथवा सहाय्यक अभियोक्ता यांनी वाद उपस्थित केलेला नाही. तथापी अर्जदाराच्या मालकी बद्दल कोणतीही शंका नाही. अभियोग पक्षाने उपस्थित केलेल्या शंका की, जप्त वाहन अर्जदाराच्या ताब्यात दिल्यास ते पुन्हा गुन्हयात वापरण्याची दाट शक्यता आहे, या शंकेचे निरसन अर्जदारास योग्य त्या अटी व शर्तीवर जप्त वाहन परत देण्यात येवू शकते. जप्त मुद्देमाल हे गुन्हयामध्ये सक्रीयरित्या वापरण्यात आले किंवा नाही हे खटल्या दरम्यान निश्चित होणार असून त्यामुळे, फक्त शंकेवर जप्त मुद्देमाल पडून खराब होण्यासाठी कोणतेही उपयुक्त कारण दिसत नाही. जप्त केलेले वाहन जर पुन्हा सोडण्यात आले तर त्याच्या मुळ स्वरुपात बदल करण्याचा अगर तबदील करण्याच्या शंकेचे निरसन अर्जदारावर योग्य त्या अटी घालुन व त्यांच्याकडून योग्य ते बंधपत्र घेऊन करण्यात येऊ शकते. न्यायालयात सदर वाहन हे खटल्यादरम्यान ओळखीसाठी व पुराव्यासाठी गरज भासणार असून त्यामुळे अशा परिस्थितीत मा. सर्वोच्च न्यायालयाचे मार्गदर्शक तत्वे लक्षात घेऊन व सदर केसची एकुण परिस्थीती पाहता काही अटीवर अर्जदार यांना हे वाहन परत देणे न्यायोचीत होणार आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## // आ दे श //

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. गु.र.नं. ३५६/२०२२ यामध्ये पिशोर पोलिस ठाणे यांनी जप्त केलेले ट्रॉली वाहन, रजिस्ट्रेशन नं.- MH-20-AY-9744, चेसीस नं.–PATB-A0329 रक्कम रु.१०,००,०००/– रक्कम रुपये (अक्षरी रुपये दहा लाख फक्त) चा सुपूर्दगीनामा न्यायालयाकडे करुन देणेच्या अटींवर व खालील शर्तीवर अर्जदार यांना त्यांच्या मागणीनुसार परत देण्यात यावी.

**अ)** अर्जदार यांनी सदर वाहनाचा रंग अथवा बाह्य व अंतरीक स्वरुपात तसेच त्याचे महत्वाचे भाग या गुन्हयांचा निकाल होईपावेतो कोणताही बदल करणेचा नाही. अर्जदाराने वाहनाची निकाल होईपर्यत पुरेपुर देखभाल करावी.

**ब)** अर्जदार यांनी आवश्यकता असेल तेंव्हा सदरचे वाहन न्यायालयात अथवा संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करावे.

**क)** अर्जदार यांनी सदर गुन्ह्याचा निकालापावेतो हे वाहन कोणत्याही प्रकारे कोणासही विकू नये, तबदील करु नये तसेच त्याच्यावर कोणताही बोजा निर्माण करु नये.

**ड)** अर्जदार यांनी या वाहनाचे दोन रंगीत फोटो विविध कोनातून जवळून घेतलेले दाखल करावेत व सदर फोटोवर अर्जदाराचे फेरसही घ्यावी.

**इ)** अर्जदार यांनी सदरच्या वाहनाचा वापर या गुन्ह्याचा निकालापावेतो इतर कोणत्याही अनुचीतरित्या किंवा गुन्हा होईल असा करणेचा नाही.

**३.** तपासीक अंमलदार यांनी सदर वाहन अर्जदार यांच्या ताब्यात देताना त्याचा रितसर पंचनामा करुन सदरचे वाहन सत्वर अर्जदार यांचे ताबेत द्यावे व तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा याबाबतचे सुचनापत्र तपासीक अंमलदार यांना पाठविण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by Vijaya Narayanrao Katkar
Date: 2022.10.21 17:29:57 +0530

**ठिकाण – कन्नड.** **(काटकर विजया एन. एस.)**
**दिनांक –२१/१०/२०२२.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,**
**कन्नड.**

## <u>प्रमाणपत्र</u>

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ.निकालपत्र/आदेश यामधील सर्व मजकुर मुळ निकालपत्र/आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | के.जी.खैरे, |
| न्यायालयाचे नांव | – | (**काटकर विजया एन. एस.**),२रे सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर), तथा प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कन्नड. |
| श्रुतलेखन दिल्याचा दिनांक | – | २१.१०.२०२२. |
| न्यायिक अधिका–यांनी निकालपत्रावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | – | २१.१०.२०२२. |
| निकालपत्र अपलोड केलेचा दिनांक | – | २१.१०.२०२२. |

..........................................................................................................................